तरुण भारत २३ जुलै २००२

# शिक्षणातून माणसं उभी राहिली पाहिजेत

## डॉ. भालबा विभुते यांचे प्रतिपादन

कोल्हापूर ■

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे. या शिक्षणातून माणसं कशी उभी राहतील हे पाहिले पाहिजे. बदलत्या संदर्भाप्रमाणे आजचे शिक्षण बदलणे गरजेचे आहे. शिक्षणातून व्यक्तिमत्वाचा विकास घडावा ही अपेक्षा आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या प्रौढ/निरंतर शिक्षण विभागाचे सहा. संचालक व विभाग प्रमुख डॉ. भालबा विभुते यांनी २१ व्या शतकाच्या शिक्षणाच्या दिशा या विषयावर बोलताना व्यक्त केले. ताराराणी विद्यापीठाच्या शारदा मंदिरात कै. सौ. सरोजिनीदेवी विश्वनाथ पाटील यांच्या ३३ व्या पुण्यतिथीनिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी गरजू विद्यार्थिनींना गणवेश वाटप करण्यात आले. यावेळी माजी कुलगुरू रा. कृ. कणबरकर, प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील, सौ. राजलक्ष्मी जाधव, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. स्वागत सौ. मेधा जाधव यांनी तर प्रास्ताविक प्रा. सौ. तेजस्विनी पाटील यांनी केले. आभार सौ. अंजली साठे यांनी मानले.